**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेच्या पावसाळी अधिवेशनात लोकसभेचं कामकाज संस्थगित

- उपराष्ट्रपतीपदासाठी इंडिया आघाडीचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी यांचा  उमेदवारी अर्ज दाखल

- परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर आज रशियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री सर्जी लेवरोव यांची भेट घेणार

- गाझा शहरावर ताबा घेण्यासाठी लष्करी कारवाई सुरु केल्याची इस्त्रायलची घोषणा, जगभरातल्या देशांकडून इस्त्रायलवर टीका

**आणि**

- श्रीनगरमधल्या दाल सरोवरात आजपासून खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सवाला सुरुवात

**<><><><>**

लोकसभेचं कामकाज आज पुढील अधिवेशनापर्यंत संस्थगित झालं. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला २१ जुलै रोजी सुरुवात झाली होती. आज लोकसभेचं कामकाज सकाळी ११ वाजता सुरु झालं. त्यानंतर बिहार मतदारयाद्या पुनरीक्षणावर चर्चा करण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली. मात्र लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारल्यामुळे संसदेत गोंधळ सुरु झाला. त्यानंतर कामकाज १२ वाजेपर्यंत तहकुब करण्यात आलं. १२ वाजता कामकाज सु◌ुरु झाल्यावरही गोंधळ सुरुच राहिल्यानं अखेर लोकसभेचं कामकाज पुढल्या अधिवेशनापर्यंत संस्थगित करण्यात आल्याचं सभापती ओम बिर्ला यांनी सांगितलं.

**- - होल्ड बाईट- -**

या अधिवेशनात एकूण १४ विधेयकं सादर झाली त्यातली १२ विधेयकं मंजूर करण्यात आली. २८ आणि २९ जुलै रोजी लोकसभेत ऑपरेशन सिंदूरवर चर्चा झाली. त्याला प्रधानमंत्र्यांनी उत्तर दिलं. या अधिवेशनात लोकसभेमध्ये केवळ ३७ तास चर्चा झाल्याचं सभापती ओम बिर्ला यांनी सांगितलं.

राज्यसभेत उपाध्यक्ष हरिवंश यांनी विरोधी सदस्यांनी दिलेले १८ स्थगन प्रस्ताव फेटाळले. त्यामुळे गोंधळ वाढला आणि राज्यसभेचं कामकाज २ वाजेपर्यंत तहकुब करण्यात आलं. त्याआधी राज्यसभा सदस्यांना कालच्या ऑनलाईन गेमिंग विधेयक २०२५ वर दुपारपर्यंत आपली मतं व्यक्त करायला सांगितलं.

**<><><><>**

इंडिया आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, शरद पवार, रामगोपाल यादव यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी रेड्डी यांनी संसद भवन संकुलातील प्रेरणा स्थळावर जाऊन महात्मा गांधींच्या पुतळ्याला अभिवादन केलं.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून सी पी राधाकृष्णन यांनी याआधी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अर्जांची छाननी उद्या होणार असून २५ ऑगस्टपर्यंत अर्ज मागे घेता येईल. ९ सप्टेंबरला उपराष्ट्रपती पदासाठी मतदान होईल.

**<><><><>**

भारत आणि रशिया विविध क्षेत्रात एकत्र कार्य करत असून त्यामुळे परस्पर सहकार्याच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज मॉस्कोत भारत रशिया व्यावसायिक फोरममध्ये बोलत होते. उद्योजकांनी आता अधिकाधिक व्यवसाय करावा त्याचप्रमाणे गुंतवणूक आणि सहकार्य करारांच्या माध्यमातून नवनव्या क्षेत्रात आर्थिक भागिदारी वाढवावी असंही ते म्हणाले. कोविडच्या संकट काळात विश्वासार्ह आणि सातत्यपूर्ण भागिदारीची आवश्यकता अधोरेखित झाली, असंही त्यांनी सांगितलं. भारत आणि रशिया यांच्यातील सहकार्य अधिक वृद्धींगत होण्याच्या दृष्टीनं एस. जयशंकर हे आज रशियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री सर्जी लेवरोव यांची भेट घेणार आहेत.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या बिहार आणि पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर जात आहेत. बिहारमधल्या गया इथं ते विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करणार

आहेत. तसंच गया ते दिल्ली अमृत भारत एक्स्प्रेस गाडीलाही ते हिरवा झेंडा दाखवतील. ६ हजार ८८० कोटींच्या ६६० मेगावॅट बक्सर औष्णिक विद्युत केंद्राचं उद्घाटनही प्रधानमंत्री करतील. तसंच ते १२६० कोटींच्या शहरी विकास प्रकल्पांची पायाभरणीही करणार आहेत.

<><><><>

फिजीचे प्रधानमंत्री सितीवेनी लिगामामदा राबुका रविवारी तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. ते सोमवारी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करतील, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. राबुका राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेणार आहेत. दोन्ही देशातील संबंध अधिक बळकट करण्यासाठी राबुका यांचा दौरा महत्त्वाचा असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><>

जम्मू आणि काश्मीरमध्ये किश्तवाड इथे ढगफुटी होऊन झालेल्या दुर्घटनेनंतर आज सलग आठव्या दिवशीही शोध आणि बचाव कार्य सुरू आहे. या दुर्घटनेतल्या मृतांचा आकडा ६५वर पोहोचला असून त्यात तीन सीआयएसएफ कर्मचारी तसंच जम्मू आणि काश्मीर पोलीस दलाच्या एका कर्मचाऱ्याचा समावेश आहे. या दुर्घटनेत १००पेक्षा जास्त लोक जखमी झाले असून ७० जण अजूनही बेपत्ता आहेत. लष्कर, एनडीआरएफ, एसडीआरएफ, पोलीस आणि स्थानिक प्रशासनाच्या मदतीने त्यांचा शोध घेत आहेत. शोधकार्यासाठी श्वानपथकाची मदत घेतली जात आहे.

<><><><>

गाझा शहरावर ताबा घेण्यासाठी आपण पहिल्या टप्प्यातली लष्करी कारवाई सुरु केल्याचं इस्त्रायलच्या लष्करानं एका निवेदनाद्वारे घोषित केलं आहे. इस्त्रायलचे संरक्षण मंत्री इस्त्रायल काट्झ यांनी काल या निर्णयाला मंजुरी दिली असून, या आठवड्याच्या अखेरीला इस्त्रायलच्या सुरक्षा मंत्रिमंडळाकडून त्याचा आढावा घेतला जाईल, असं यात म्हटलं आहे.

गाझावर मोठा हल्ला करण्याच्या दृष्टीनं शहराबाहेर, विशेषतः झीटौन आणि जबालिया भागात आपलं लष्कर यापूर्वीच कार्यरत झालं असून, या कारवाईसाठी ६० हजार राखीव सैनिकांना तैनात केल्याचं यात म्हटलं आहे. हमासच्या लष्करी पायाभूत सुविधा नष्ट करून त्यांना गाझाच्या इतर नागरिकांपासून वेगळं पाडून कमकुवत करणं, हे आपलं उद्दिष्ट असल्याचं इस्त्राएलनं म्हटलं आहे.

दरम्यान, इस्त्राएलच्या युद्धखोरीवर जगभरातल्या अनेक मित्र राष्ट्रांनी टीका केली असून, यामुळे मोठी आपत्ती आणि प्रादेशिक अस्थिरता निर्माण होईल असा इशारा फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांनी दिला आहे. गाझा मधल्या परिस्थितीबद्दल आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संघटनेनंही चिंता व्यक्त केली आहे.

दरम्यान, कतार आणि इजिप्तनं ६० दिवसांचा युद्धविराम आणि निम्म्या ओलिसांची सुटका यासह एक नवीन युद्धबंदी कराराचा प्रस्ताव ठेवला आहे. या प्रस्तावाला आपण मंजुरी दिली आहे, मात्र अद्याप इस्त्राएलनं त्याला औपचारिक प्रतिसाद दिला नसल्याचं हमासनं म्हटलं आहे. तर, आपल्याला असा संपूर्ण करार हवा आहे, ज्यामध्ये सर्व ओलिसांची सुटका समाविष्ट असेल, असं इस्त्राएलच्या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात गेले काही दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे सिंधू नदीच्या पाणी पातळीत लक्षणीय वाढ झाली असून सखल भागातल्या गावांमधले हजारो नागरिक विस्थापित झाले आहेत. पुराच्या पाण्यामुळे या भागातलं पशुधनही बाधित झालं आहे.

सरगोधा, फैसलाबाद, आणि इतर शहरांमध्ये तसंच लाहोर, गुजरांवाला आणि रावळपिंडी या शहरांमध्ये काल मुसळधार पाऊस झाल्याचं वृत्त आहे. पाकिस्तानच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारानं संपूर्ण पंजाब प्रांताला रेड अलर्ट जारी केला आहे.

**<><><><>**

जम्मू-काश्मीरमध्ये श्रीनगर इथल्या दाल सरोवरात आजपासून येत्या २३ ऑगस्ट पर्यंत तीन दिवसीय खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. जम्मू-काश्मीरची संस्कृती आणि नैसर्गिक सौंदर्याचा उत्सव म्हणून हा महोत्सव साजरा होत आहे. खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सव शुभंकर हिमालयीन किंगफिशरपासून प्रेरित आहे.

या महोत्सवात एकूण ३६ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधले ५०० पेक्षा जास्त खेळाडू रोइंग, कॅनोइंग आणि कायाकिंग या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होतील. यावेळी वॉटर स्कीइंग, ड्रॅगन बोट आणि शिकारा शर्यत यासारखे जल क्रीडा प्रकारही सादर होतील.

भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि जम्मू-काश्मीर क्रीडा परिषदेनं संयुक्तपणे आयोजित केलेला हा महोत्सव सरकारच्या 'खेलो भारत' धोरणाचा भाग असून, तळागाळातल्या क्रीडा प्रतिभेला प्रोत्साहन देणं, उपजीविकेचं साधन निर्माण करणं आणि स्थानिक पायाभूत सुविधांचं पुनरुज्जीवन करणं, हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे.

<><><><>

दक्षिण कोरियाच्या बुसान इथं होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या विजन श्रेणीमध्ये भारताच्या वतीने त्रिबेणी राय यांच्या शेप ऑफ मोमो हा चित्रपट अधिकृतपणे पाठवण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर बुसान चित्रपट महोत्सवही प्रतिष्ठेचा मानला जातो. या महोत्सवात अनेक आशियाई चित्रपट पाहण्याची संधी रसिकांना मिळणार आहे.

//<><><><>//